
दुरावा
हा काय योग ऐसा, एकांत करी नकोसा
हा जुलूमभास मजसी, छळवाद हा दुरावा ॥ १ ॥
सखीची भेट होती, साजिरीच पौर्णिमा ती
जो वाटे हवा हवासा, चंद्र आज का नसावा ॥ २ ॥
रजनीत धुंदी वेडी, स्मरते मिठी गुलाबी
श्वासात भारला गंध, आज का नसावा? ॥ ३ ॥
ते केश मेघश्यामल, वाऱ्यावरी मुजोर
तो मखमली विसावा, का आज ना मिळावा? ॥ ४ ॥
डोळ्यात पाहिले ते, सौंदर्य पास नाही
नयनात तरळता तो, भाव आज का नसावा? ॥ ५ ॥
तो हात हाती घेता, आश्वस्त साथ होता
तो संग वेचलेला, क्षण आज का नसावा? ॥ ६ ॥
©सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78